## ॥ मुंबई ॥

ध्येय धडक स्पंदनात, स्वप्न भेट डोळ्यात
पाय धावती येथ, हि खास मुंबई ॥ १ ॥

काफिले माणसांचे, जरी धाऊक गर्दी,
जिगर लागते, हि; ना ऐऱ्यागैऱ्याची मुंबई ॥ २ ॥

असे राजा कोणी, धडपडे कष्टी कोणी
साय कोणाची हि, कोणाची भाकरी मुंबई ॥ ३ ॥

माणुसकीचा झरा येथ, पंथ सारे एक होती
ऐक्य; प्रेम मिरवीते, ललाटी माय मुंबई ॥ ४ ॥

सधन-गरीब, लहान- मोठा, कसलाच भेद नाही
काम करिती; राबती, कष्टकरी दिवसरात्र मुंबई ॥ ५ ॥

काम मुंबई, नग दाम मुंबई, जान मुंबई
आराम मुंबई, जल्लोष मुंबई, शान मुंबई ॥ ६ ॥

सुरुवात मुंबई, अपयश मुंबई, सांत्वन मुंबई
प्रयत्न मुंबई, आसरा मुंबई, भरघोस यश मुंबई ॥ ७ ॥

अनुभव मुंबई, साथ मुंबई, दिलदार मुंबई
विश्वात साऱ्या लक्षवेधी, आपली दमदार मुंबई ॥ ८ ॥

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78

हि कविता सर्व मुंबई प्रेमींना समर्पित ...

Visit www.saarthbodh.com for more poems